# बृहन्मुंबई महानगरपालिका

सहाय्यक आयुक्त पी/दक्षिण विभाग, यांचे कार्यालय, सी.टी.एस. क्र. 746, एस.व्ही. रोड, गोरेगांव (प.), मुंबई – 400 104.

सआपी/द/१४८३/एस.आर/स.अ. (परि.) दि.३१/०८/२०२३

## जाहीर सूचना

**विषय:-** गोरेगाव (पू) न.भू.क्र.८०, ८१, ८२, ८३, ८४ गाव दिंडोशी तसेच न.भू.क्र.२७२, २७३, ५८८ गाव पहाडी गोरेगाव (पू) आरे चेक नाका ते मोहन गोखले रोड येथील १८.३० मी. विकास नियोजन रस्ता, सर्वोदय नगर, दूधसागर रोड मधील बाधित बांधकामांचे विकास नियंत्रण नियमावली २०३४ मधील नियम ३३ (१२) (ब) अन्वये पुनर्वसन करणेबाबत.

बृहन्मुंबई महानगरपालिकेसाठी महाराष्ट्र शासनाने विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमन – २०३४ ला मंजुरी दिलेली आहे

Tolerated / Protected बांधकामे काढून त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी नियम ३३ (१२) (ब) अंतर्गत एक विशेष तरतूद करण्यात आलेली आहे, ज्यात असे म्हटले आहे की अशा योजनेत विद्यमान रस्त्याच्या रुंदीकरणात जेथे रस्ता रेषा नियमित केली आहे किंवा विकास नियोजित रस्ता आहे त्या ठिकाणच्या रस्त्याच्या संरेखनात येणारी Tolerated / Protected बांधकामे काढून त्यांचे त्वरीत पुनर्वसन त्याच प्रशासकीय प्रभागात करणे प्रस्तावित केले गेलेले आहे.

या अनुषंगाने या विभागामार्फत सोबत जोडलेल्या Annexure-A-1 व Annexure-A-2 मध्ये दर्शविल्याप्रमाणे गोरेगाव (पू) न.भू.क्र.८०, ८१, ८२, ८३, ८४ गाव दिंडोशी तसेच न.भू.क्र.२७२, २७३, ५८८ गाव पहाडी गोरेगाव (पू) आरे चेक नाका ते मोहन गोखले रोड येथील १८.३० मी. विकास नियोजन रस्ता, सर्वोदय नगर, दूधसागर रोड मधील बांधकामांचे विकास नियंत्रण नियमावली २०३४ मधील नियम ३३ (१२) (ब) अन्वये पुनर्वसन करण्याचे योजिले आहे.

पी/दक्षिण विभागात या प्रस्तावित कामाकरिता विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४च्या ३३ (१२) (ब) व AC / Estate / 472811 / AE (I) - III दिनांक 20/06/2023 मधील प्राप्त तरतुदीची अंमलबजावणी च्या अनुषंगाने विकासकाकडून Annexure-A-1 व Annexure-A-2 मध्ये नमूद बाधित झोपडीधारकांचे गोरेगाव, पी/दक्षिण विभागातच पुनर्वसन करण्याकरिता इच्छापत्र मागवण्यात येत आहे.

तरी, इच्छुक विकासकाकडून या विभागास लेखी कळविण्यात यावे. तसेच या बाबतीत अधिकच्या महितीकरिता सहाय्यक अभियंता (परि.) पी/दक्षिण विभाग यांच्याशी संपर्क साधावा. प्रथम येणाऱ्या विकासकास प्रथम प्राधान्य देण्यात येईल.

सही/-

**सहाय्यक आयुक्त, पी/दक्षिण (प्र)**